






# बनुताई आणि बंटीबाबा





## मुकुंद कर्णिक





# बनुताई आणि बंटीबाबा

## मुकुंद कर्णिक

ई साहित्य प्रतिष्ठान







# बनुताई आणि बंटीबाबा

## मुकुंद कर्णिक

पोस्ट बॉक्स २६२४३४
दुबई, संयुक्त अरब अमिराती
दूरध्वनी: ००९७१ ५० ५९७३८१०
ईमेलः karnik.mukund@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किव्हा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे . तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते .

## प्रकाशक :- ई साहित्य प्रतिष्ठान

## संपादिका :- अनघा हिरे (9422284116)

www.esahity.com
esahity@gmail.com

**प्रकाशन** :- २६ मार्च २०१७

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध

- आपले वाचून झाल्यावर आपण फॉरवर्ड करू शकता
- हे पुस्तक वेबसाईट वर ठेवण्यापूर्वी किंवा वाचना व्यातिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी आवश्यक आहे.

# अर्पण पत्रिका

मराठी जगातल्या सगळ्या

बनुताया आणि बंटीबाबांना

आजोबांकडून ही भेट.







मी मुकुंद संतुराम कर्णिक, सध्या वास्तव्य दुबई (संयुक्त अरब अमिराती) मध्ये, पण जन्माने महाराष्ट्रातील कोल्हापूरचा. आम्ही भाऊ बहिणी मिळून अकराजण. माझा क्रमांक दहावा. आमचे वडील कै. संतुराम रामकृष्ण कर्णिक (संराक) हे स्वत: चांगले साहित्यिक होते. इंग्रजी, मराठी, संस्कृत आणि फ्रेंच या भाषांवर त्यांचे प्रभुत्व होते. ते "संराक" या टोपण नावाने कविता करत असत. आम्हा सर्वच भावंडांना थोडया फार प्रमाणात त्यांच्यातल्या साहित्यिक गुणाचा वारसा मिळाला आहे. माझ्या स्वत:विषयी आणखी थोडं सांगायचं तर मी स्थापत्यशास्त्रातील पदवीधर आहे. दगडाधोंड्यांमध्ये, सिमेंटवाळूमध्ये हात असले तरी मन कवितांमध्ये आहे. माझी पत्नी (कै.) कांचन, मुले सिद्धार्थ व परीक्षित आणि सुना अनुराधा व ज्योती यांनी माझ्या कविता आनंदाने ऐकल्या आणि मला प्रोत्साहन दिले म्हणून मी जे काही लिहिले त्यातले काही थोडेसे आज तुमच्यापुढे प्रस्तुत केले आहे.

# मनोगत

बनुताई आणि बंटीबाबा ही कुठल्याही आजोबाला आवडतील अशीच नातवंडं आहेत. बनुताईंनी मराठी वेबसाईट ‘मायबोली’ च्या ‘गुलमोहर’ या व्यासपीठावर पाय ठेवल्याठेवल्याच सगळ्या वाचकांना काका, मामा, काकी, मामी, मावशी, आत्या अशा प्रेमाच्या नात्यांच्या धाग्यानी बांधून घेतलं. ही सगळी नाती प्रथम बनुताईंची आतुरतेने वाट पाहू लागली. आणि नंतर जेव्हा बंटीबाबांनी या जगात एंट्री घेतली तेव्हाच्या त्यांच्या प्रत्यक्ष देवबाप्पाशी झालेल्या संभाषणामुळे ही सगळी नाती त्यांनी पण जिंकली.

या सगळ्या वाचकांची इच्छा होती की त्यांची छोटी छोटी मुलं, नातवंडं जेव्हा लिहू वाचू शकतील तेव्हा त्यांच्यासाठी हा बनुताई आणि बंटीबाबांच्या कवितांचा ठेवा उपलब्ध असायला हवा. म्हणून त्यानी या कविता पुस्तकरूपात संग्रहित करायचा आग्रह केला. त्या आग्रहाची ही फलश्रुती.

मुकुंद कर्णिक





# अनुक्रमणिका


१. नर्सरी ऱ्हाइम्स
२. बनुताई
३. बनुताईंची शाळा
४. बनुताईंची संध्याकाळ
५. बनुताईंची मराठी भाषा
६. बनुताईंची ट्रीप
७. बनुताई 'मिस् वर्ल्ड'
८. बनुताईंच्या पार्टीची तयारी
९.बनुताईंच्या सबबी
१०. बनुताईंचा भाऊ
११. बनुताई, इरा आणि 'हडिप्पा'
१२. बनुताईंची दिवाळी
१३. बनुताईंचं ड्रॉइंग
१४. बनुताईंची हाऊसमेड
१५. बनुताईंचा पी. जे.
१६. बनुताईंची खानावळ
१७. बनुताई - ऑफ टु दुबई
१८. बंटीबाबा टु गॉड
१९.बंटीबाबांची तक्रार
२०. कुरकुर बंटीबाबांची
२१.बनुताई says,"बंटीबाबा, सॉरी"
२२. बंटी..खूष हुवा !!
२३. अरे फिशी फिशी
२४. "क्या नाम ऐ तेला?"
२५. बंटीची नौटंकी
२६. बंटीबाबा - ऑस्कर नॉमिनी
२७. बनू बंटीचा अल्टिमेटम
२८. बंटीबाबांची गीतमाला
२९. बनुताईंची री-एंट्री
३०. बनुताई आणि बंटीतला तंटा
३१. बनू आणि बंटीची जुगलबंदी
३२. बंटीबाबांची खंडणी
३३. बंटीबाबांचं सिक्रेट
३४. बंटीबाबाना लागली भूक
३५. बंटीबाबांचे सोळा दात
३६. सेपरेट कॉट
३७. बंटीबाबांच्या अटी
३८. चिमणुलिबाय, ओ चिमणुलिबाय
३९. बंटीबाबा आणि इडली
४०. उठा उठा बंटीबाबा







# १. नर्सरी ऱ्हाइम्स

१

*(Little Miss Muffet, sat on a tuffet,*
*eating the curds and whey*
*There came a big spider, sat down besides her and frightened Miss Muffet away)*

छोटयाश्या बनुताई सतरंजी अंथरतात नि
चमचावाटी हातात घेऊन दही खात बसतात
होते काय गंमत, येते छतावरनं सूत
सुताच्या टोकावर असते एक कोळयाचे भूत
कोळीदादाना येताना बनुताई बघतात, मग
उडते त्यांची घाबरगुंडी वाटी टाकून पळतात

२.

*(Mary had a little lamb its fleece was white like snow*
*Everywhere that  Mary went, the lamb was sure to go)*

बनुताईंची होती एक गोरीचिट्टी मेंढी
बर्फासारखी पांढरीफेक लोकरीची गुंडी
बनुताई जातिल जेथे, जाई ही मेंढी
शाळेत जाऊन बसायला बाक पण धुंडी

३.

*(Johny Johny, Yes Papa? .. Eating sugar? No papa Telling lies?.. No papa... Open your mouth ....Ha Ha Ha!!)*

बनुताई, बनुताई, "काय गं आई?"

साखर खातेस ना? खरं कीनई?

"नाहि ग, खोटं मी कशाला सांगू?"

मं उघड तुझी मूठ नि दाखव मला बघू.

४.

*(Jack and Jill went up the hill to fetch a pail of water Jack fell down and broke his crown and Jill came tumbling after)*

बंटी आणि बनू टेकडीवर गेली,

पाण्यासाठी बादली नवीकोरी नेली

बंटी पडला घसरून पाय मुरगळुन

बनू त्याच्यापाठोपाठ गडगडत आली

५.

*(Twinkle, twinkle little star, How I wonder what you are Up above the world so high, Like a diamond in the sky)*

चम्मक चम्मक चांदणी, तू दिसतेस माहिताय कशी?

आभाळाच्या खाणीमधला लख लख हिराच जशी







६.

*(Humpty Dumpty sat on a wall,*
*Humpty Dumpty had a great fall.*
*All the king's horses and all the king's men*
*Couldn't put Humpty Dumpty together again)*

गोल-मटोल गोळे बंधू बसले फळीवर
फळी जराशी हलली तर पडले फरशीवर
दोन्ही गोल-मटोल बंधू होउन गेले चप्पट
नकाच उठवु त्याना तुम्ही, हात होतिल चिक्कट

७.

*(Yankee Doodle went to town riding on a pony*
*Stuck a feather in his cap and called it macaroni)*

बंकी धाण्डे चालले गावी तट्टाणीवर बसून
सापडलेले मोराचे एक पीस टोपीत खोचून
चाबुक म्हणून हातामध्ये घेतली होती दोरी
पण तोंड होते शेपटीकडे हंसली पोरे सारी

८

*(Simple Simon met a pieman going to the fare*
*Said simple Simon to the pieman, “Show me your ware”*
*Said the pieman to simple Simon, “Show me first your penny”*
*Said simple Simon to the pieman, “Indeed I haven’t got any)*

साधाभोळा वामन चालला होता धारावीस

ताज्या पावाच्या वासाने झाला कासावीस

बेकरीमध्ये जाउन म्हटला, "दाखवा नमुना"

मुन्ना बेकरीवाला बोलला, "पैसा दिखाना"

वामन म्हटला, "पैसा कैसा नमुन्यासाठी?"

मुन्नाभाईने उगारली मग ही ऽऽ मोठ्ठी काठी










# २. बनुताई



बनुताईंच्या निळ्या फ्रॉकला छान छान लेस
पिवळ्या रिबिनीत बांधले सोनेरी केस

गोऱ्या गोऱ्या पायांसाठी गुढग्यापर्यंत स्टॉकिंग
'पिक् पॉक्' बूट वाजवत करतात त्या वॉकिंग

एका हातात बाबांचे अन दुसऱ्यात आइचे बोट...
...धरून चालतात दुडक्या, मिरवत लालगुलाबी ओठ

फुलपाखरू जर दिसले तर मधेच थप्प्कन थांबतात
हात सोडून त्याच्या मागे पकडायला धावतात

लब्बाड फुलपाखरू जाते कुठल्याकुठे उडून
"द्या ना बाबा पकडुन" म्हणत बनुताई बसतात अडून

बाबाना कसलं पळायला येतंय? 'हाफ.. हुफ..' करतात
"नाही सापडत मला, बेटा" म्हणत मागे वळतात

बनुताईंच्या गालाचे मग होतात हुप्प फुगे
डोळे येतात डबडबून जर आई भरली रागे

आई आणि बाबांशीपण होते मग कट्टी
हळूच मिळते चॉकलेट, मग बाबांशीच बट्टी

पप्पी घेते आई आणि लागते डोळे पुसू
बनुताईंच्या ओठांतुन मग खुद्कन फुटते हसू










# ३. बनुताईंची शाळा

बनुताई शाळेमधे जायला आता लागल्यात
शाळा आहे राजवाड्या जवळच्या एका बंगल्यात

नाव त्यांच्या शाळेचे होली क्रॉस कॉन्व्हेंट
टीचर मिस हेलन अन् फादर बर्टी व्हिन्सेंट

बनुताईंना खूऽऽपच आवडली आहे शाळा
जामानिमा केलाय् बाबानी सगळा गोळा

काळे शूज, निळा स्कर्ट, पांढराधोप टॉप
लाल हेअर बँड, युनिफॉर्म टिपटॉप

पाठीवरच्या स्कूलबॅगवर सश्याचे तोंड
पाण्याच्या बाटलीला हत्तीची सोंड

टिफिनमधे कधी मफिन, ब्रेडजॅम कधी
तूपसाखरपोळीभाजी असते अधीमधी

मफिन, जॅम, तूपसाखर होते चट्टामट्टा
ब्रेड, पोळीभाजी बनतात कावळ्यांचा वाटा

बसनी जायचं शाळेला हे आईला नाही पास
म्हणून नेण्याआणण्यासाठी रिक्शा आहे खास

रिक्शावाल्या सुरेशची भरते कंबक्ती
"मस्ती नको" म्हणून जेव्हा करतो तो सक्ती

बनुताई दादा बनुन हल्लाबोल करतात
धुडकावून त्याला, हॉर्न वाजऽऽव वाजवतात







# ४. बनुताईंची संध्याकाळ

शाळा सुटली म्हणजे बनुताई येतात रिक्शाकडे
सुरेश सांगतो हासत हासत कसे दिसे रुपडे

“सुटलेलि शूलेस, हेअरबँड हातात नि मागं बॅग फरफटतात
विस्कटल्या ड्रेसवर मातीचे डाग, ‘डाग चांगले असतात’
म्हणतात”

बनुताई येतात हाततोंड धुवुन अन फ्रॉकही बदलून
अजून चालू असते ‘धूम मचा ले’ ची धून

आई देते गोड शिरा पण दूधहि लावते प्याया
झोपुन थोडे बनुताई होतात तयार खेळाया

पण बाबांचा हुकूम सुटतो ‘बनु, बस अभ्यासाला’
अन् मग लागे जबरदस्तिने टेबल्स घोकायाला

गरिब बिचाऱ्या आजोबांनाच शिक्षा ती खाशी
इथेहि चालते बनुताईंची सॉलिड चापलुसी

"टू वन्जा टू .. टू वन्जा टू... आजोबाऽऽ, तो बगा आला टांगा;
टू वन्जा टू .... टू टू जा फो ....पन फाय का नाय ? सांगा"

हताश होऊन आजोबा हात डोक्यावर नेतात
धुम मचा ले ओरडत बनुताई तेव्हढ्यात धुम ठोकतात

बाहुली बाहुला, ठिक्करबिल्ला कोण हे खेळेल?
बनुताईंची गँग खेळते क्रिकेट सारा वेळ

दिवेलागणीच्या वेळी मग घरात त्या येती
'दिव्या दिव्या' अन् 'शांताकारम्' बाबांसह म्हणती

रात्री जेवण भरवायाला आजोबाच त्यांना हवे
हट्टापुढती बाबानाही लागे नमते घ्यावे

मउ भाताचे घास आजोबा गोलगोलसे करतात
घास गालात अन् बोबड्या बोलात बनुताई फर्मावतात,

"ऑबॉ मॉलॉ पुडच्यॉ घॉशॉत मॉरंबॉ पॉयजेलॉय"
नाही म्हणतिल आजोबा? बिशात त्यांची काय?

"भात संपव आधि" किचनमधून आई ओरडते
आजोबांचे जाते बोट तोंडावर नि मुरंबा फोड मिळते

झोपताना बनुताई स्वत:च सांगतात आजोबाना गोष्टी
निष्पाप बोलांनी नकळत भिजते आजोबांची दृष्टी







"आजोबा, शांगा न आजीला तुमी हाक काय मालायचा?
बाबा कशे आईला 'चिम्' म्हंतात तशे तुमि काय बोलायचा?"

बनुताईना घेतात जवळ आजोबा नि मायेने थोपटतात
हळु हळु आंगठा चोखत बनुताई निद्रावश होतात

आजीच्या साडीची आजोबानी शिवलेली मऊ उबदार दुलई,
तिच्यात स्वत:ला घेऊन गुरफटुन निजतात बनुताई





# ५. बनुताईंची मराठी भाषा

सकाळपासुन आईच्यामागे बनुताई भुणभुण लावी
"ट्रीपआय आमची आफ्टर टुमॉरो, बाबांचि पर्मिशन हवी,

जुनियर, सिनियर के जी जाणार फोर्ट पन्हाळ्याला
टीचरनि सांगलय सगळ्याना ट्वेंटी रुपीज आणायला"

बाबा म्हटले "आपण बनुताई, जाऊ ना गाडीनी
तर म्ह्टल्या त्या "नोऽऽ नं, बाबा आय वाँटु गो बसनी"

"फत्तेसिंग, रुशिकेश, सुचित्रा, संजुहि जाणारैत
अॅग्री केलंय आजोबानि, ट्वेंटि रुपीज देणारैत"

बाबा झाले तयार रदबदलीने आईच्या
अन मग पारावार न उरला खुशीस बनुताईंच्या

बनुताई बोलतात अशी अस्खलित कॉन्व्हेंटची भाषा
(जरि म्हणती त्या श्लोक रोजचे बिनचुक अक्षरश:)



## ६. बनुताईंची ट्रीप

पन्हाळ्याची ट्रीप संपवुन जेव्हा बनुताई आल्या
खरचटलेल्या, विस्कटलेल्या तरिही 'एक्साइट्लेल्या'

क्काऽऽय आणी कित्त्ती मज्जा सांगावी सगळ्याना
म्हणून नव्हती उसंत बनूताईंच्या शब्दाना,

"कित्त्ती मज्जा केली म्हाइताय आम्ही ट्रीपमध्धे ?
येता जाता गाणी पण किति म्हटली बसमध्धे.

थंडी वाज्ली, कडकडून ग भूक पण लाग्लेली
टिफिन खाल्ल्यावर सगळ्यानी फिरायला सुर्वात केली



आई, हिस्ट्रीबुक मध्धे पण आहे पन्न्हाळा
कित्त्ती जागा दाखवल्या टीचरनी आम्हाला

सजा कोठडी नावाचे ग दगडी घर एक तेथे
संबाजीला बाबानि त्याच्या प्रिझनर ठेवले होते

अग, शिवाजी म्हाराज संबाजीचे बाबा होते
म्हणतात संबाजीने त्यांचे काय्तरि ऐक्ले नव्हते







बाबा, संबाजीचे बाबा होते का हो वाईट ?
करत कशी होते मग वाइट लोकांशी ते फाईट ?

आजोबा, तिथं मोठ्ठा स्टॅच्यू होता बाजिप्रभूंचा
नाइ का तुम्मी गोष्ट त्यांची कितिदा सांगायचा?

आणि आई तिथं होता एक बुरुज पिसाटीचा
तबक गार्डन आणि विष्णूकुंडहि पाण्याचा

कुंड म्हण्जे वेल गऽऽ, डबल्यू ई एल्लेल् वेऽऽल
पाणी गार पण टीचर म्हटल्या ड्रिंकिंग् ला अन्वेल

आण्लय तिथनं तुझ्यासाठि मी कढिलिंबाचं झाड
वॉटरबॉटल्मध्धे ठेवलय पाणी ओतुन काढ

अग्ग, टाकू नको नं काठी ती आहे माझी तल्वार
फत्तेसिंगने दिले मला, ती शाळेत आहे मी नेणार"

बोलुनबोलुन थकल्या तेव्हा झोपुन गेल्या ताई
झोपेतदेखिल तल्वार त्यांच्या हातातुन सुटली नाही



# ७. बनुताई 'मिस् वर्ल्ड'



बाबा मला म्हणतात 'बनुताई झिपरी',
आई म्हणे 'मिच्कुल्या डोळ्यांची'
काकाना दिसतंय नाक अपरं तर
मामा म्हणे वजनात दोन् तोळ्यांची

मावशी नि काकी, दोघीना बाकी,
जरा तरी आहे माझी कदर
घरि जाते त्यांच्या, तेव्हा मीठ मिर्च्यांनी
काढायची म्हणतात हिची नजर

आत्याबाई आईला म्हणतात
"कशाला उचलुन आणलित कुणाची"
आजोबाच एकटे बागड-बन-बनुला

म्हणतात 'बनुताई गुणाची'
मिच्कुल्या डोळ्यांचि, झिपऱ्या केसांचि,
अपऱ्या नाकाची मला म्हणता ?
खोटारडे कुठले मं गालांची माझ्या
उठसूट पप्पी का घेता ?

म्हणाऽऽल तेव्हा, ... होईन मी जेव्हा,
मिस् इंडिया नि मिस् वर्ल्डऽऽ
"अरे, याच बनूला म्हणायचे आपण कि
'कैच्च्या कैच आय हिचं रुपडं' "

मी बाई तव्वर फोटो माझा
कुण्णालाच मुळि नाई द्‌यायची
अहो नायतर माझ्या नाकाची, डोळ्यांची,
झिपऱ्यांचि जगभर कॉपि व्हायची





# ८. बनुताईंच्या पार्टीची तयारी

आईऽऽ, माझ्यापण मित्राना कधी ग बोलवायचं?
घरी बोलवुन हळदीकुंकू सगळ्याना द्यायच ?

तुझ्या मैत्रिणी कशा ग येतात हळदीकुंकवाला ?
बोलवायचय ना मलाहि नासिर, ऋषी नि मेरीला

लिली, धनंजय, संजू, अंजुम, फत्ते नि अनिकेत
हे पण माझे बेस्ट्फ्रेंड् तेव्हा बोलवायचे आहेत

नायतर करुया का ग सत्तेनारायण पूजा ?
काकांच्या घरि झाली तेव्हा कित्ती नं मज्जा ?

कशी नं साधू ट्रेडरची शिप समुद्रात बुडली ?
वाइफनि त्याच्या प्रसाद खाल्यावर वरती आली ?

प्रसाद पण किति मस्तच अस्तो नै का ग आई ?
शिरा गुलगुलित गोड मला किति आवडतो बाई !

(पण) खाय्ला मिळाय्ला सगळी स्टोरी लागते ऐकाय्ला...
नै चालणार हंऽऽ! आधीच पायजेत वडे, शिरा द्यायला

नकोच नायतर; बोलव माझ्या बर्थ्डेच्या दिवशी
सगळे येतिल, प्रेझेंट्स देखिल मिळतिल छानशी

अग पण माझा हॅपी बर्थ्डे कधि येतो ते सांग
कॅलेंडरमधि बघतेस का ? की देउ तुला पंचांग ?

बाबा, वर्षानेच कसा हो येतो माझा बर्थडे ?
एव्हरी मंथ अस्तो नै का हो दोन तारिखचा डे










# ९.बनुताईंच्या सबबी

बाइ, बाईऽ आज होणाराय उठायला उशीर
सांगावे का कपाळाची उठली होती शीर?

आपला साध्या पोटदुखीवर नाई भरवसा
बघायलाच हवा रेड झालाय का घसा

रात्री पासुन पाठ, पाय दुखवावेत काय?
का डोळ्याना आप्ल्या टायर्ड ठरवावे काय?

जेवणात होते श्रीखंड मस्त, अजुन आहे सुस्ती
"बनूऽऽ, शाळा!" ऐकू येताच झोपच येते नुस्ती

"एक्स्क्यूजेस का?" म्हणता?, माझे होमवर्क नाई झाले
सोने वाटायच्या भरात राहूनच गेले

टीचर रागावल्या की रडू येते डोळे भरून
रहावे का घरीच आज शाळेला दांडी मारून

आई आहे खमकी, काही ऐकायची नाही
शक्कल नवी लढवायला हवी आता काही

बाबा होतात फितुर अन मलाच रागवतात
द्यावे झाले मॅटर आता आजोबांच्या हातात

पप्पीची नि मिठीची द्यावी जराशी लाच
गालावर घासुन गाल गळ्यात टाकावा हात

बोलावं, "ऑज्योबॉऽऽ ऑज शॉळेत जॉय्चं नॉईऽऽ"
म्हणतिल, "एव्हढंच? हात्तिच्या ! ओक्के बनुताई"





## १०. बनुताईंचा भाऊ

बनुताईंना हवाय आता एक छोटा भाऊ
आईला म्हणतात "आण, त्याचं नाव बंटी ठेऊ.

डोके त्याचे छान चेंडूसारखे दिसावे;
गाल कसे माझ्यापेक्षा गुब्बु असावे;

आई, त्याचे डोळे जरा पिचके असू देत;
जांभई देताना दात नको दिसू देत;

ट्यांहा ट्यांहा भाषेमधे माझ्याशी बोलेल;
काय हवे त्याला मला नक्की समजेल;

हाताशी मी बोट नेता पटकन् पकडू दे;
दोन्ही मुठी तोंडाजवळ घेऊन झोपू दे.

मऊ मऊ दुपट्यात त्याला छान गुंडाळून

देशिल ना ग मांडीवर माझ्या तू ठेऊन?

तुझ्या ओरडण्याने जर जागा होईल बाई

’ धुम मचा ले’  गाऊन त्याला करविन गाईगाई"

(’धूम मचाले, धूम मचाले, धूम’  हे बनुताईंचे फार आवडते गाणे आहे आणि ते त्या आवाज टिपेला नेऊन गातात.)





# ११. बनुताई, इरा आणि 'हडिप्पा'

मॉलमध्धे काय झाली गम्मत, आजोबा, माइताय का?
अहो आम्हाला भेट्लं तिथं कोण ओळखा?..काळेलकाका!!(*)

काकांच्या पोटावर बांधलेली कांगारूची पोटली
पोटलित होती एक छान अन गुटगुटीतशी गठली

काकानि मला ओळखले हं ! म्हण्ले, "हाय् बनुताई"
मी पण म्हटले, "हाय्" पण गठली मुळीच बोलली नाई

डोक्याला तिच्या होते गुबगुबित एस्कीमोचे बॉनेट
गोलगोल डोळ्यानी बघतच न्हायली माझ्या डोळ्यात थेट

काका हसले आणि म्हणाले, "मीट हर, शी इज इरा;
आणि इरा, या बनुताई बरं का. बघ तरि यांचा तोरा !"

डुच्कन हलली मान अन इरा हसली बोळके उघडुन
इवल्या हातात पटकन् माझे बोट तिने ठेवले पकडुन

काका म्हटले, "इराला 'धुम मचाले' शिकवाल का?"
आईच बोलली, "थांबलय ते; आता घोष आहे 'हडिप्पा' "

(*) हे माझे मायबोलीवरचे सन्मित्र श्री. प्रकाश काळेल. त्यांना कन्यारत्न प्राप्त झाले, नाव तिचे इरा. तेव्हा केलेली ही कविता.



# १२. बनुताईंची दिवाळी

बाबा, तुमी आकाशकंदिल कधी करणाराय?
आई, कानवल्याना सुर्वात कधी होणाराय?
ओऽ गॉड ! बाबा रोजच येतात उशीरा
कोण जाणे आईचा आळस कधी जाणाराय ! १

आजोबानाच सांग्ते आता कंदिल करायला
जग्गात त्तस्सा कुण्णाचाच नको असायला
सुचित्राच्या बाबानी विकत आणलाय, ईऽऽ
आजोबांचा कंदिल नंबर व्वन असणाराय ! २

आणि आई, माझा ड्रेस अजुन आला नाई
त्याच्यावर मॅचिंग पर्स पण हवी मला बाई
तुझ्यासारखी नथ पण घेशिल का ग मला?
मी पण घालुन नाकात ती मिरवणाराय ! ३

चकल्या करणारैस, पण पुडाच्या वडयांचं काय?
आजोबांच्या फेवरिट त्या, तुला पण माइताय
कोतंबीर निवडायला तुला मदत मी करीन
बघ हंऽ? केल्या नाईस तर मी कट्टी करणाराय ४

आणि आई, बाबांसाठी घे न काय तरी
तुला पाडव्याला ते देणारायत जुवेलरी
बाबा आपले बिचारे कधीच नाहीत मागत
सांग न त्याना तू यावेळी काय देणाराय? हं? काय देणाराय?









# १३. बनुताईंचं ड्रॉइंग

एग्झॅम माझी चालू होती, बर का वैशूमावशी
अभ्यासातनं मला नवती फुरसत म्हणुन कशी !

तश्शी, जशी आर्या होती बिझी, नाइ का तेव्हा ?
सांगा मं मी तुमच्याशी बोलणार होते केव्हा?

संपत आली आता, उद्या पेपर आहे लास्ट
उद्यानंतर असेन फ्री बोलायला बिन्धास्त

काल होता बर का माझा ड्रॉइंगचा पेपर
काढायचे होते शीवाजीम्हाराज घोड्यावर

तेवढे काढुन आणखिनपण काढला एक किल्ला
झेंडा सुध्दा काढुन त्याच्या रूफवर ठेवला

म्हाराजांना फायटिंगला जायची होती घाई
म्हणुन दारात उभ्या केल्या म्हाराजांच्या आई

म्हाराजांच्या तोंडापुढं काढला फुगा मोठा
आणि मग फुग्यात लिहलं "मासाहेब, टाटा"

निशा मॅडम हसल्या, म्हटल्या, "लव्हली, इट्स फाईन"
आउट ऑफ टेन, मार्क त्यांनी मला दिले नाईन

आईईग्ग! आहे आरिथ्मॅटिक पेपर अजून बाकी,
आजोबांच्या मते मला झीरो मार्क नक्की

पेपरमध्धे सम्स नकोत यायला म्हणजे झालं
एवढ्यासाठी गॉडला मी आइस्क्रीम प्रॉमिस केलं







# १४. बनुताईंची हाऊसमेड

(बनुताईंच्या घरी खूप पूर्वीपासून इंदूबाई नावाची एक हाऊसमेड आहे. वयस्कर आहे. बनूची आई लग्न होऊन घरात यायच्या कितीतरी आधीपासून इंदूबाई कामाला आहे. स्वयपाकात मदत, केरवारा, वगैरे खूप कामे करते. बनूवर खूप माया करते पण का कोणास ठाऊक बनुताईंची तिच्यावर भारी खुन्नस. काहीतरी कारण शोधून त्याना काढून टाकायला लावायचं असा बनुताईंचा प्रयत्न असतो.)

आई, पैले इंदूबाईना कामावरनं काढ !
रोज गालगुच्चा घेतात, म्हणतात, "लईऽ ग्वाड"

हात किती खर्खरित, लाग्तात ना गं मला
सांगित्लं तर म्हणतात, "मग पप्पी देशीला?"

माझ्या रूममध्धे पण लुडबूड त्या करतात
चांगले पसरून ठेवलेले गेम्स आवरतात

कोणी सांगित्ले ग त्याना अस्ले उपद्व्याप?
परतपरत मांडण्यामध्धे कित्ती होतो ताप !

शार्पनरमधून पेन्सिलीच्या रिंगा काढल्या होत्या
फुलं म्हणुन वहीवर चिकटवाच्या होत्या

अग्गंऽऽ आज बघ्ते तर टाक्ल्यात टोपलीमध्धे
कशासाठी करतात त्या हे उल्टेसुल्टे धंदे ?

चपात्या तू करतेस गोऱ्या, गोल, सिल्की मऊ
खाताना त्या वाटते मला किती किती खाऊ !

त्यांच्या चपात्यांचा असतो ऑस्ट्रेलियन मॅप
जाड तर इत्क्या, हाफ सेंटीमीटर स्लॅब !

भाजी आणि आमटी तर तिखटजाळ करतात
ओन्ली तू नि बाबा दोघे मिट्क्या मारत खातात

आजोबांच जाऊ दे, ते एक पक्के कोल्हापुरी
मला हवी अस्ते जरा गोडसरच करी

आणि, बायका गोल साडित टाप् टीप दिस्तात
या मात्र भटजींच्या धोतरासारखी नेसतात

कशासाठी अस्लंतस्लं चालवुन आपण घ्यायच?
कामावर त्याना आता नाईच ठेवाय्चं !

घरची सग्गळी कामे तर तूही करू शकतेस
कशाला मं 'इंदूबाई, इंदूबाई' करतेस ?

'उद्यापासुन नाई यायचं' आज त्याना सांग
नाय्तर माझी कट्टी समज सिक्स मंथ लाँग







# १५. बनुताईंचा पी. जे.

(बनुताई आता मित्रमैत्रिणींकडून नवीन नवीन पी जे शिकून येतात आणि आई, बाबा, आजोबा, सगळ्याना 'कॅप्टिव्ह ऑडियन्स' करून ऐकायला लावतात. शिष्टसंमत नसतील कदाचित पण बनुताईंच्या वयाची मुलं असले जोक्स खूपच एन्जॉय करतात हे मी पाह्यलंय. हा जोक सांगतानाचं बनुताईंचं अनकंट्रोलेबल खिदळणं ऐकून मला वाटलं, 'शिष्टसंमतीची ऐसी की तैसी' तुम्हाला हा जोक तिच्याच शब्दात सांगायलाच हवा.)

बाबा, आत्ता बोला, चॅलेंज माझा घेता काय
कोडं घालणाराय मी उत्तर तुम्ही देता काय?

बघा हं उत्तर येत नस्लं तर उठाबशि काढायची
कोड्यात आहे स्टोरी (खि: खि:) एका मुलगीची

आई, तू नको ऐकू, आज तू आमच्यामध्धे नाहिस
उत्तर फोड्तेस आणि वर हास्तेस म्हणून आज तू ढीस !

हं तर बाबा, ऐका, तिकडुन एक मुलगी आली
झप्झप चालत, पळतच होती कुठं तरी चाल्ली

समोरनं आला माणुस आणि विचारायला लाग्ला
"नाव काय तुझं ? नि घाईनं कुठं चाल्लिस ग बाळा?"

ओळखा बाबा, एका शब्दात उत्तर तिनि काय दिलं
ऐकुन जे माण्साला जोरात हसायला आलं

माझ्या या कोड्याचं तुम्ही, बाबा, उत्तर सांगा
नाय्तर वेताळाच्यासारखं झाडाला उल्टं टांगा

नाई हो बाबा, नव्हति ती बनू मॉलमधे चाल्लेली
विसरता कशे अहो ती मुलगी एकच वर्ड बोल्लेली

सांगू उत्तर? नाई, नाई, पैले कबुल करा की हरला,
बाबाऽऽ, (खि: खि:) मुलगी (खू: खू:) बोल्ली होती "शीला"







# १६. बनुताईंची खानावळ

पक्षांसाठी बनुताईंची खानावळ नवीन
खानावळीत कामगार नेमले आहेत बस्स् तीन

बाबा बाजारमास्तर - पाव, बाजरी आणायला
आई आहे खानावळीचा स्टॉक ठेवायला

वाढपी म्हणुन आजोबांची नेमणुक झाली आहे
खानावळीची मालकिण अर्थात बनुताईच आहे

मेंबर झालेत आजवर जवळजवळ वीस
सकाळ दुपार संध्याकाळ पंगती अगणित

चौदा चिमण्या, पिजन्स तीन आणि दोन चकोर
आणखी एक बुल्बुल पण जो आहे भुरटा चोर

उजाडतानाच सकाळी मेंबर होतात हजर
कुणी असतं शांत कुणी लावतं ट्वि ट्वी गजर

चिवचिवाट चिमण्यांचा चालतो भुकेपोटी
बुलबुल अस्तो पोझ घेउन नजर टाकत चोरटी

पिजन्स बोलत नाहित, नुस्ती चालीचाली करतात
चकोर आपले बापुडवाणे बघत उभे राहतात

बनुताई नि आजोबा येतात बाल्कनीत
चकोरांची जोडी अस्ते दार न्याहाळीत

धावत येतात चकोर बनुताईना पाह्यल्यावर
आणि अगदी तुटुन पडतात वाढल्या पावावर

वाकडी मान करून बुल्बुल टिपण नीट साधतो
चकोरांच्या चोचीखालुन पाव उचलुन जातो

संधी पाहून पिजन्स मारतात दोन्हींवरती ताव
बाजरी खाऊन पुन्हा जातात पळवायला पाव

बाजरीवरती चिमण्यांचा हल्लाबोल होतो
बघताबघता भांड्याचा तळ दिसू लागतो

पिण्यासाठी पाण्याचा ठेवला आहे माठ
कधी कधी चिमण्या त्यातच आंघोळ उरकतात

काय म्हणता ? खानावळीत प्राप्ती काय मिळते?
बनुताईंच्या डोळ्यांमध्धे हसू जे फुलते ! !









(कधी उघडतात हो?)



(येतायत की नाही मालकिणबाई आणि वाढपी?)



(काय रे, बरं वाटलं का आजचं जेवण? )



(वा. मस्तच आहे की.)



(का ग? ती ही नाही आली आज अजून?)



(बरं बाई हिचं पोट एव्हढ्यात भरलं.)



(आणखीन वाढा थोडी, मेंबर जादा आलेत.)







(ओक्के, आता जरा बाजरीकडे जाऊया.)



(हं. बघाच आता कसा सफाईनं पळवतो तुमचा पाव.)



# १७. बनुताई - ऑफ टु दुबई

क्काऽय म्हणू बई बई माझ्या फर्गेट्फुल्नेस्ला
सांगितलंच नाही की मी चाल्ले दुबईला !

बाबा आणि आजोबांचे जॉब्स आहेत जिथं
आई म्हण्ते आपण पण आता ऱ्हायला जायचं तिथं

व्हीसा बीसा काय म्हण्तात ते बाबानी काढ्लंय
आणि एरोप्लेनचं त्यांनी तिकीटहि पाठवलंय

मज्जा वाट्ते काहो प्लेनमध्धे बसायला?
माझ्या तर बई पोटात उठलाय हा मोठ्ठा गोळा

म्हणतात, बांधुन ठेवतात आत सीटशी पट्ट्यानी
हात पण काढायचा नस्तो विण्डोबाहेर कुणी

वाटेत भेटला मून तऽर मग शेकहॅण्ड करणार कसा?
कान हालवतानाच दिस्णार काहो तिथ्ला ससा?

कर्जत लोणावळ्यासारखी लाग्तात का हो स्टेशन्स
सॅण्डविच, वडा नि चिक्कीसाठी धरायला लागेल पेशन्स?

आई म्हणते जेवायला पण सीटवरच देतात
गोऱ्या गोऱ्या होस्टेसिस मग ट्रे उचलुन नेतात.

(त्यावरनं आठवलं आई, इंदुबाइना पण नेउया
जवळ घेउन मला काल ग टीअर्स सांडत रडल्या)

आत्या, मावशी, मामी, काकी, मामा आणि काका
तुम्ही देखिल एनी टाइम भेटाय्ला यायचं बरं का

सेटल झाल्यावर मी सांगिन दुबईमधल्या गमती
तोवर पाठवा ईमेल banutaai@gmail.com वरती













# १८. बंटीबाबा टु गॉड

(दुबईला आल्यापासून बनुताईंनी स्वत:ला सगळ्या फूड आउट्लेट्सना भेटी देणे, डेझर्ट सफारी, मित्रमैत्रिणींची नवीन गॅंग जमवणे, प्लेग्राउंड्स, आइस्क्रीम, चॉकलेटस् वगैरेंमधे गुंतवून ठेवलंय. त्यामुळे आता कवितांमधे यायला वेळ नाही मिळणार म्हणतात. "अधीमधी कधीतरी येईन म्हणावे" असा निरोप द्यायला सांगितलंय त्यानी. तुम्हाला रेग्युलरली भेटायची जबाबदारी त्यानी आता 'बंटीबाबा' वर सोपवलीय. बंटी आठवतोय ना? बनुताईंनी आईकडे खास मागणी केलेला भाऊ? तो आला परवा.)

थँक्स, सोड हात आता पलिकडे जातो
आतून दिस्ली आई तिला बाहेरून पहातो.

कोण रे या बाय्का आता बाहेर मला नेतायत?
तुझ्या हातामधुन हात माझा सोडवून घेतायत?

हस्तायत सग्ळया, तिकडं आई घामाने निथळते
पण खरं सांगू? अरे, तुझ्याऽऽ पेक्षाऽऽ छाऽऽन दिस्ते !!

येरे तुही थोडा इथे, आईला माझ्या भेट
घाम तिचा पूस आणि मगच जा तू थेट

नाहि नाही गरज माझी ओळख करुन द्याय्ची
बाहेर आलो तेव्हाच हाक ऐकू आली तिची

'ते कोण' काय विचारतोस? अरे, बाबा माझे ते
रोज नाई का माझ्याशी बोबडे बोलायचे?

आईला रोज समजावायचे धीर देत देत
आता बघ अवतार ! स्वता तेच गोंधळलेत

आणि माणसाला एका मिठी मारून रडतायत
स्वत: बाबा आहेत तरी त्याला 'बाबा' म्हणतायत

बाबा का रे बाबांचे ते? बरे वाट्तायत नई?
बघूऽऽ आता लाड माझे पुरवतायत की नाही.

ओके, ओके, नीघ आता, आय नो यू आर बिझी
पण विसरू नकोस मला...मीही ठेविन आठवण तुझी









# १९.बंटीबाबांची तक्रार

अग आई बनुताई का गं आली नाई?
कित्ती शोधलं तरी मला दिस्ली कशी नाई?

बोलव न ग तिला जर थांब्ली असेल घरी
ताई माझी कशी? मला बघू दे तरी

तिनंच नं माझ्यासाठी हट्ट होता केला?
म्हणून तर बाप्पा मला "जा तू" म्हणाला

चल नं आई, जाऊया आत्त्त्ता आपल्या घरी
ताई माझी कशी? मला बघू दे तरी

बाप्पा म्हण्ला होता, ताई आहे पॉप्युलर
मावश्या, काक्या सगळे करतात प्रेम तिच्यावर

नक्की छान असणार ताई, जशी कुणी परी !
ताई माझी कशी? मला बघू दे तरी

मांडीवर तिच्या मला आहे लोळाय्चं
धुम्म मचाले गाणं तिचं आहे ऐकाय्चं

ऐकायचीये मला तिच्या ट्रीपमध्ली स्टोरी
ताई माझी कशी? मला बघू दे तरी

तिच्याकडे पक्षी म्हणे येतात जेवायला
खानाव्ळीत तिच्या तुम्ही अस्ता कामाला

जोक्स तिचे एंजॉय करता म्हणे तुम्ही सारी
ताई माझी कशी? मला बघू दे तरी

ताईबद्दल बोल्ताना बाप्पा नाई थक्ला
"आण्खि सांग्तो आण्खि सांग्तो" सारखं म्हणत ऱ्हायला

कामं जरी होती त्याची पेंडिंग कितीतरी.
अश्शी माझी ताई !! मला बघू दे तरी





# २०. कुरकुर बंटीबाबांची

अगं आई, किती जरी मोठ्ठं तुझं घर
आधीच्या घराची माझ्या त्याला नाही सर!

एकच रूम होती पण सेल्फ कंटेन्ड होती
डेडीकेटेड स्विमिंगपूल पण होता माझ्यासाठी

हातपाय हलवत मनासारखा पोहायचो गं मज्जेत
इथं सदान्कदा मला कपड्यात गुंडाळतेस

ए सी नाय्तर हीटर ची तुझ्या घरी सक्ती
मला तिथे या गोष्टींची गरजच ग नव्हती

नऊ महिन्यांच्या टेनन्सीत नव्हतं काही रेंट
बाबांच्या पेमध्नं किती कटतात ग पर्सेंट ?

ऱ्हायचं होतं मला आण्खी थोडे दिवस तिथं
तुलाच झाली घाई आणि बोलावलंस इथं

म्हट्लं नं की ऱ्हाईन आता तुमच्याबरोबर?
बांध्ता कशाला ग मग दुप्ट्यात वरचेवर?

कुणी ना कुणीतरी सारखं उचलुन घेता
जरादेखिल शिंकलो तरी घाबरेघुबरे होता!

ऐक, बाबानी काल आणलाय माझ्यासाठी स्ट्रोलर
चल नेऊन त्यात्नं, दाखव इथ्ला परीसर





# २१.बनुताई says,"बंटीबाबा, सॉरी "

बंटीबाबा, सॉरी हं, मी आधी नाई आले
कशी येणार? सर्दीने मी बेजार होते झाले

पप्पी घेतल्याशिवाय तुमची ऱ्हाय्लीच मी नस्ती
तुम्हाला पण नाई का मग सर्दी झाली अस्ती ?

ब्बाईऽऽ आता दुबईची हवा गार खूप
गुंडाळू तुम्हाला आता दुपट्यात गुडुप

हातपाय काही केल्या हल्वायचे नाही
दुपट्याची गठली कधी सोडवाय्ची नाही

लुकुलुकु डोळ्यानी बघाय्चं नुस्तं
दुदु पिऊन झाल्यावर बर्प द्यायचा मस्त

ओकी ओकी करून कवडी टाकू नका हंऽ
वाढती लागो शिंक येवो घाबरू नका हंऽ

म्हणेल आई "शत्तंऽजिव आणि चिरंऽजीव !"
मीनिंग त्याचा म्हाईताय? "करेक्ट, लॉंग लिव्ह"

आणखी थोडे दिवस तुम्ही आईजवळ झोपा
नंतर आपण दोघे मिळुन करुच दंगाधोपा

बरं आता बंटीबाबा, झोपा डोळे झाकुन
तवर येते माय्बोलीवर फेरी मी टाकुन

बघाच, तिथं बनुताई खरड अश्शी काढील,
"का नाई पाठवत ईमेल?" जाब विचारील





# २२. बंटी..खूष हुवा !!

ताई अग ऐक नं, मला घालणार म्हणे पाळण्यात
अग्गं म्हणजे एग्झॅक्टली काय गं करतात त्यात?

घात्लं होता का गं त्यात तुला पण कधी?
शाळेत जाय्ला लाग्तं का ग पाळण्यात जायच्याआधी?

सगळ्या म्हणत होत्या पाच नावं ठेवाय्ची
काय ग अस्सं केलंय म्हणून शिक्षा मी घ्यायची?

तूच न ठरवलं होतंस नाव माझं 'बंटी'
क्का म्हणून बद्लाय्चं ते? सांग नं? कशासाठी?

म्हणतात बंटी ऱ्हाइम नै होत कुण्णाच्या नावाशी
काय ग देणं घेणं अस्तय नावाचं नावाशी?

माइताय तुला ? बाबांचंऽ नाव आप्ल्या 'सिद्धार्थ'
म्हणून नाव मला आता देणार आहेत 'पार्थ'!

सिद्धार्थचा पार्थ असं म्हणणार म्हणे मला
तशीच का गं अनूची बनू केली तुला?

वॉव! हो की ! नाव तुझं ऱ्हाइम होतय आईशी
कित्ती क्लेव्हर बाय्का ग या नावं ठेव्तात अश्शी!

"हॅट्स ऑफ" कसं करू? टोपरं नाही लूज
सांग नाव आवडलं! नि बंटी हुवा खूष!!







# २३. अरे फिशी फिशी

बनुताई आता मोठ्या झाल्यात. बंटीबाबाला कडेवर घेऊन एंजल मासे असलेल्या फिश टँकसमोर हे गाणं म्हणून त्याला रिझवतात. प्रत्येक कडव्यानंतर "है" म्हणत कडवं रिपीट करताना बंटीबाबाला हळूच एक झोका देतात तेव्हाचं बंटीबाबाचं खिदळणंही ऐकण्यासारखं असतं.



कल्लेवाल्या माशाला फुटल्या मिश्या दोन
मनीमाउनं केला त्याला ट्रिंग ट्रिंग फोन
है........

"अरे फिशी फिशी, तुला आली कशी मिशी ?
टोचेल न रे मला, मग खाऊ तुला कशी ?"
है........

मासा हसला गडगडून म्हटला "द्वे द्वाळी,
मनीमाऊ, खा आता फुटासची गोळी"
है.......

पाण्यात बुडवुन पंजा बसली मनीमाऊ टपून
चान्स बघता बघता गेली तिथच तशीच झोपून
है.......

कल्लेवाल्या माशाला फुटल्या मिश्या दोन
मनीमाउनं केला त्याला ट्रिंग ट्रिंग फोन









# २४. "क्या नाम ऐ तेला?"

(रोज संध्याकाळी प्रॅममधून बंटीबाबांची एक रपेट कॉलनीतल्या क्रिकेट ग्राउंडवरून असते. छोट्या छोट्या मुलांना घेऊन कितीतरी आईवडील तिथे आलेले असतात. दोन तीन रशियन फॅमिलीज देखील असतात त्यांच्यात. बंटीच्या प्रॅमच्या वाटेवरच बाकांवर आईवडील असतात बसलेले आणि त्यांची गोंडस मुलं मजेत आवतीभवती बागडत असतात. बंटीबाबा नेहमी प्रॅममधे बसल्याबसल्या मान वळवून वळवून, कुतुहलाने, काही तरी प्रश्न पडल्यासारखं त्यांच्याकडे बघतात.

बाबा, तुम्मी बनुताईला शांगा काऽय तली
भूऽऽल नाई नेत मला आल्यावल घली

तुम्मी आनि आबा कशे नेता लगेच उचलुन
तिलाच फक्त लावायलाऽ लागते लालीगोली

नेते जेव्वा, तेव्वा नेते एकाच थिकानी
जिते अश्तात खेलत तिच्या खाश मैतलनी

क्लिकेत ग्लाऊंदवऽल भेत्तात मैतल्नी तिच्या
"कित्त्त्ती क्यूऽऽत" मनत माजा घेतात गाल्गुच्चा

कशं शांगू त्याना, बाबा, दुक्तो माजा गाल
पप्पी त्या घेतात तेव्वा होतो लालीलाल

आनि वल शांग्तात आप्ली पप्पी घे मनून !
लाज वात्ते ना ओ मला, हश्तात शग्ले बगून

बाबा, एक मुल्गी येते, हम्प्ती दम्प्ती दब्बु
दोले निले निले आनि गाल गुब्बु गुब्बु

गोली गोली पान आनि केश शोनेली
शग्ले मन्तात की ती आए लशियामदली

बाबा शांगा, नाव कशं विचालू तिला?
"वॉत्च्योल नेम?" मनू का? की "क्या नामऐ तेला?"





# २५. बंटीची नौटंकी

बंटी आता माझी पाळी, गप्प जरा रहा
भांडं तुझं आबांकडे फोडते कस्सं पहा !

एकेक करून युक्त्या तुझ्या फोडते आबांकडे
कांगावा कर्तोस कसा ते घडघड वाचते धडे

ढक्लून मला ओरडतोस तू, “लाग्लंऽ, लाग्लंऽ, लाग्लंऽ”
आबांकडून म्हण्वायला, “अरेरेरेऽ, कुणी मारलं ?”

फसतात आबा, घेतात पप्पी, लाग्लं नसलं तरी
कर्तोस तू मग चालू तुझ्या तक्रारींची जंत्री

मी पण आहे ओळखुन तुझ्या अस्ल्या सगळ्या युक्त्या
आबाना सांग्ते, “द्या चापट भागावर दुख्त्या”

गरिब बिचारे आबा म्हण्तात, “नाइनाई गं बनुताई,
बंटीबाबा कळवळ्ला, तो उगाच रड्णार नाई”

आईच तेव्हा येउन सांग्ते, “लबाड आहे पक्का !
त्यानंच मारला असेल बिचाऱ्या बनुताईला धक्का.

अहोऽ, मला ठाउक आहेत या त्याच्या नौटंकी
आकांडतांडव का हे माइताय? चॉक्लेट हवाय नक्की

काही केलं तरि नाइ मिळणार आज दुसरं चॉक्लेट
जोवर नाही संप्वत ब्रेकफास्ट ब्रेड आणि ऑम्लेट

नाय्तर देईन मीच आता रट्टे सप्पासप्प !"
लग्गेच कस्सा होतोस मग तू शाहण्यासारखा गप्प ?

एक्दम कोठे जाते तेव्हा मारलेल्याची दुखी?
आबा, ठेवा लक्शात्त बरं का ही पैली नौटंकी







## २६. बंटीबाबा – ऑस्कर नॉमिनी

ताई, आता चेंज कर भांडायचा मूड.
नाय्तर सग्ळे म्हण्तिल, "ही जोडी नाई गुड"

ताई ग ताई, मोठ्ठी तू, चिड्णं नाई बरं
धाकट्या भावाला म्हणावं, "तुझं म्हण्णं खरं"

म्हणशील तसं तर मीही भांडाय्चा नाई
फक्त म्हणेन, "थँक्यू, आय टोल्ड यू सो ताई"

आई बाजू तुझी घेते; बाबा माझी घेतात.
आबा नेहमी मध्यस्ती कराय्ला पुढे येतात.

माझ्या चुग्ल्या तू कर्तेस नि तुझ्या कर्तो मी;
पण, अग, खरं ठर्तं माझंच नेहमी.

म्हट्लं तर नेहमीच अस्तो माझा कांगावा.
खरं ठर्वून घ्याय्ला ॲक्टर तयारीचाच हवा.

मग सांग, तुझा पाड कस्सा गं लागणार?
ऑस्करसाठी यावर्षी, बघ, माझंच नाव जाणार.







## २७. बनू बंटीचा अल्टिमेटम

आबा, तुम्ही आम्च्यावर पाळत ठेवता का हो ?
सग्ळी आम्ची बिंगं तुम्ही बाहेर फोड्ता ना हो ?

काका काकी, मामा मामी, आत्या तश्या मावश्या
जेव्हा भेटतात तेव्हा कर्तात सग्ळ्याच चौऽकशा

म्हण्तात, "आता दुसरी कसली नौटंकी सांगा ना"
सिक्रेट म्हणून सांगित्लेलं कळलं कसं त्याना ?

बंटी किती चिड्ला होता माइताय नं तुम्हाला?
नंतर मग त्यानं गुग्ली टाक्ला होता क्कस्स्ला !

नको म्हटलं तरी तुम्ही लगेच सग्ळं ल्हीता
आणि गुल्मोहरच्या पाराकडं धाव घेता

तेव्हा कशी नाई हो मऽ दुखत तुम्ची कंबर ?
चुगलखोरीत आम्ही कस्ले? तुम्चाच पैला नंबर

आता आमच्या दोघात दोस्ती झाली आहे बर् का
तेव्हा आता आबाऽ, तुम्ही बाजूलाच सरका

आमच्या दोघांच्या खोलीत याय्चं पण नाई
तुम्च्या खोलित संस्क्रित लिहा, आम्ही बघ्णार नाई

बंटीसाठी जर रोऽज आणाल मोठ्ठं चॉक्लेट
आणि मला द्याल कार्टून डीव्हीडींची भेट

तरच कधीतरी घेऊ खोलीमध्धे आमच्या
आणि देऊ सब्जेक्ट बालकवितेला तुमच्या









# २८. बंटीबाबांची गीतमाला

आबा, तुमच्या वेळी होती 'बिनाका गीतमाला' *
सोळा गाणी मिळायची ऐकायला तुम्हाला

पायरीला 'पाएदान' म्हणायचे अमिन सयानी
शेवट व्हायचा मालेचा 'सरताज' गाण्यानी

आइबाबाना सांग्ता तेव्हा मी पण हे ऐक्तो
गुंगुन जाता बोल्ताना ते देखिल ओळख्तो

आता ऐका माझी पण गाण्यांची ही लिस्ट
सग्ळी गाणी आहेत माझी ऑल टाइम फेव्हरीट

नवव्या पायरीवर आहे 'भोलानाथचं गाणं'
आठवीवरती आहे 'पळत्या झाडांना पहाणं'

त्या गाण्याच्या नंतर 'शाळा सुटली पाटी फ़ुटली'
साहवी 'छडी छमछम' लागत हातावर उठली

पाचवे पाएदानपर आएगी 'नानी तेरी मोरनी'

सल्लुभाईचं 'डिंका चिका' चौथ्या पाएदानी

'नाचरे मोरा' येतंय नंतर पायरीवर तिसऱ्या
'लक्कडीकी काठी' हे पाएदानावर दुसऱ्या

आणि आता ऐका बरंऽऽ 'चोटीपर'चं सॉंग
ओळखलत का? अग्दी कर्रेक्ट! नाही तुम्ही रॉंग

'चिल्लर पार्टी' आय्टम सॉंगची गोडीच अफ़्लातून
'आजा रे छोकरे, भेजा न ठोक रे आरेलाए आपून' **

-आबा, स्टार द्यायला सांगितले तिथल्या लिंका द्यायला विसरू नका. नाय्तर ते कायाय ते कुणाकुणाला कळणार नाई आणि माझ्या कवितेची मज्जाच जाईल.
-ठीकाय बंटीबाबा, या बघा दिल्या.

* http://www.youtube.com/watch?v=PSSZxw4K9cY&feature=related

** http://www.youtube.com/watch?v=Aa889-1IRcM









# २९. बनुताईंची री-एंट्री

आबा, सांगू नका मला मायबोलीवर जायला
पार गुलमोहरचा, काबिज बंटीने आहे केला

कानामागून आला आणि झाला आहे तिखट
पारावर बघ्घा कस्सा बस्ला आहे चिक्कट

काक्या, माम्या, आत्या मावश्या फितुर त्याला झाल्या
बंटी बंटी करताना त्या बनूला विसरल्या

भेटले नाही थोडे दिवस म्हणून काय झालं?
कित्ती दिवस नाई का त्याना मी आनंदी केलं?

बंटी यायच्या आधी, सांगा, मीच होते ना?
सांगितल्यात नं कित्ती माझ्या गोष्टी तुम्ही त्याना?

मुलगा असला म्हणून इत्कं डोक्यावर घ्यायच्चं?
आणि बनू मुल्गी म्हणून विसरुन तिला जाय्चं?

थिस इज नॉट फेअर, तुम्ही सांगा सगळ्याना

द्यायला लागेल म्हणाव त्याना याचा जुर्माना

तुम्हाला पण सांगते, आज वेळ नाई मला
कार्टून शो ला जायचंय घेऊन बंटीबाबाला







# ३०. बनुताई आणि बंटीतला तंटा

**बनुताई:**

बंटी, कबूल कर हं, की मीच आहे जिंक्ले
सग्ळे माझे फॅन्स मी वळवून पुन्हा घेत्ले.

आता पैजेचं चॉक्लेट दे, होताच तसा करार.
जा जा पाय्जे तर कर आईकडं तक्रार.

**बंटीबाबा:**

ताई, घे हे चॉक्लेट, जादा भाव नको मारू.
पैला डाव भुताचा असच आम्ही धरू.

दुसया डावात बघशिल तू आमची करामत,
मला हरू देतील? नाई आबांची शामत.

**बनुताई:**

टिव्टीव नको करू जास्त, सिनीयर मी आहे,
तुझ्र्यासारख्या चिट्मुऱ्याला नक्की भारी आहे.

उडवू नकोस नाक, आधीच आहे येवढुस्ससं.
माझ्याकड्नं धडे घे तू लिहायचं कसं.

**बंटीबाबा:**

आबा, हिला दाखवू नका कविता पुढची.
कॉपी करून म्हणेल ती आहे बनूची.

तीऽऽऽ, जिच्यात आहे हो बंटीची गीतमाला,
नाई का मी डिक्टेट काल केली तुम्हाला ?









# ३१. बनू आणि बंटीची जुगलबंदी

आई, बघ नं बंटीनं पुस्तक माझं फाडलं
रेघोट्यांचं जाळं सगळ्या पानांवर खरडलं

कशी वाचू सांग मं मी जॉग्रुफीचे धडे ?
म्हणून आता वाचायला मी हॅरी पॉटर काढलं

बंटी, नको ना रे आता हे पण पुस्तक फाडू
आणि माझ्या चष्म्याची काडी नको तोडू

नको का दिसायला तुझं एवढुस्ससं नाक?
कशाला चढवतोस रे ते? ओढू? ओढू? ओढू?

जा ना इथुन घेऊन तुझे फ्रॉगी आणि रॅट
नाय्तर घे ते मऊ मऊ कापूस भरलं कॅट

जा, बघ केली आईने खीर तुझ्यासाठी
खाऊन ये मग शिकविन तुला धरतात कशी बॅट

ज्जा, ज्जा, ज्जा ना बंटी, माझी पेन्सिल नको घेऊ
ज्जा नाय्तर बघ! पाठित रपाटा एक देऊ?

बघा बघा कांगावा ! मी नुस्तं बोलले तरी !
अय्य्याई ! बंटी, नक्को ना रे बोट माझं चावू





# ३२. बंटीबाबांची खंडणी

बाबा माझ्या बर्थडेला गिफ्ट काय देणार?
बघा हं, चिल्लरपिल्लर नाय चालणार

आई म्हटली होती जिलबी आर्डर करणाराय
तुमच्याकडुन सांगा नक्की काय मिळणाराय?

केक हवा मोठ्ठा त्यावर मिकी माऊस हवा
अंगा पण छान छान हवा नवा नवा

नवे कोरे बूट हवेत दिवे लागणारे
चालताना पिक पॉक आवाज देणारे

आणखी पण काही तरी तुमच्याकडून हवय
आत्ताच नाही सांगत, माझं अजून ठरायचय

आबा काय देणारायत ठाऊक आहे मला
मीच तर लावलंय त्याना कबुल करायला

सिक्रेट आहे आमचं मी तुम्हाला का सांगू?
लगेच लागाल तुम्ही ते माझ्याकडे मागू

बरं बरं सांगतो, एक चॉक्लेटचा डबा
शंभर चॉक्लेट्वाला मला देणार आहेत आबा

त्यातलं एक चॉक्लेट मी देईन तुम्हाला
देणार असाल सायकल जर तीन चाकी मला







# ३३. बंटीबाबांचं सिक्रेट

बाबा तुम्मी रोजच का हो उशीरानी येता ?
सकाळी मी उठण्याआधी निघून पण जाता ?

आई मण्ते नोकरीसाठी जावं लागतं असं
सांगा पण मग माझ्याशी खेळाल तुम्मी कसं?

साएब मणुन कोणी मणे नोकरीमद्धे असतात
उशीरानी येणाऱ्यांचा पगार पण ते कापतात

आई घेते ॲपल कापून खायला तस का?
आणि कापलेला पगार पण तेच खातात का ?

साय्बांना नस्तात का कोणी बनू आणि बंटी?
विरघळवून टाकेल त्याना अशी ज्यांची मिठी?

अस्ले कस्ले साएब अस्तात तुम्च्या कामावर?
काढून टाका बघु त्याना उद्या गेल्यावर !

बाबा सांगू का हो माझं सिक्रेट तुम्माला ?
फोडू नका बरं का ते ताई नि आईला

तुम्मी जाताना सकाळी जागा अस्तो मी
झोपेचं सोंग मुद्दामून घेउन ऱ्हातो मी

हळुच घेता पप्पी तुम्मी डोळ्यांची गालांची
आवडते ती म्हणून करतो असली चालाखी











# ३४. बंटीबाबाना लागली भूक

आई मला लागलीये भूक खूप खूप
वरणभातावर घाल खूप सारं तूप

आजोबा भरव्तिल करून गोलगोल घास
अग त्यांच्या घासाना चव अस्ते खास

किती छान कुस्करून मऊ कालवतात
मज्जा येते जाताना गुट्टुक्क पोटात

मधनंच लाव्तिल घासाला लोणच्याचं बोट
खाताखाता होऊन जाईल टुम्म माझं पोट

देईन बर का नंतर मी ढेकर "ओब्बबा"
हसून "शाब्बास बंटीबाबा" म्हण्तिल आजोबा



## ३५. बंटीबाबांचे सोळा दात

आई, आता बस्स तुझा खिमटेवाला भात
तोंडामधे माझ्या आले आहेत सोळा दात
भाज्यांचंही करतेस गुर्गुट वरण भातामध्धे
ओळखता पण येत नाही काय काय आहे त्यात.

कधी म्हणतेस चिकन तर कधी मासाबाऊ
सगळंच लागतंय सारखं मग सांग कसं खाऊ?
माहिताय न तुला सगळं चावता येतंय मला
वेगळंवगळं दे नं भाजी, चपाती नि भात.

आणि हो, ते बस्स तुझं बाऊलमध्धे देणं
चमच्या चमच्याने माझ्या तोंडात भरवणं
आता जेवू दे नं डायनिंग टेबलखुर्चीवर
आजोबांनी दिलेल्या त्या पाच खणी ताटात.







## ३६. सेपरेट कॉट

बाबा, माझा फर्स्ट हॅपी बर्थ्डे काल झाला
तेव्हा “बंटी मोठा झाला” तुम्हीच म्हणाला

आई, आता हवी मला माझी सेप्रेट कॉट
तुमच्या दोघांमध्ये माझी लागते पुरी वाट

जागा नस्ते लोळाय्ला तुम्च्या दोघांमद्धे
बाबांच्या पोटात ग मग बस्तात माझे गुद्दे

तुलादेखील लाग्तात नं खायला माझ्या लाथा?
म्हणून तुमच्या दोघात मी झोप्णार नाई आता

हं, पण आभाळ गडगडून पाऊस धुम्धार पडेल
आणि मोठ्ठ्या आवाजात वीज कडकडेल

नाय्तर बागुलबोवा आला असेल अंधारात
तेव्हा मात्र उडी मारून येईन मी दोघात

घे हं तेव्हा गुर्फटून कुशीत तुझ्या मला
बाबा जाऊ देत तेव्हा आजोबांच्या सोबतीला









## ३७. बंटीबाबांच्या अटी



आई, बाबा, शाळेत तुम्ही घालणार केव्हा मला
आत्ताच सांगा नाय्तर मी करीन हल्लागुल्ला

कुठली शाळा तिचे आधी नाव मी विचारिन
दाखवा नेउन शाळा पैले, आवडते का पाहिन

टीचर दिस्ल्या चांग्ल्या आणि बिल्डिंग अस्ली चांग्ली
ग्राउंड अस्ला खेळाय्ला नि वर्गात चित्रं टांग्ली

स्विंग आणि स्लाईडसकट चांग्ले अस्तिल गेम
तरच त्या शाळेत माझे घालायचे नेम

बसनी नाई जाणार मी सांगुन ठेव्तो पैले
शाळेत सोडाय्ला नि न्यायला आबा पायजेत आले

बाबा तुम्ही येऊ नका, आबा असतील ड्राय्व्हर
आरामात मी गाडीत त्यांच्या बसेन मागच्या सीटवर

आई, टिफिनमध्दे पाय्जेत मफ़िन आणि चॉक्लेट
शाळेत अलाउड नस्णार नं सुर्मई, बोंबिल, पाप्लेट?

आणि अध्नंमध्नं दे चकली खमंग ताजी
कधीतरीच चालेल तुझी चपाती नि भाजी

शाळा सुट्ल्यानंतर मी घरी येईन जेव्हा
गरम गोड शिरा तय्यार अस्ला पाय्जे तेव्हा

दूध बीध प्यायची मला सक्ती नाई चाल्णार

आधीच सांगून ठेव्तो, नाय्तर शाळेत नाइ जाणार









## ३८. चिमणुलिबाय, ओ चिमणुलिबाय

चिमणुलिबाय, ओ चिमणुलिबाय,
सायलीच्या वेलीवर करताय काय?

घरासाठि जागा शोधताय का?
अहो, बंटीची मदत मं घेताय का?

बंटीकडे घर आहे छप्परदार
चौकोनी भिंती नि गोलगोल दार

चिंचेच्या झाडावर बांधलंय बघा
बघा नि सांगा, आवडलं का ?

बरं राहू द्या, मं ते वेलीवरलं घ्या
“भाड्याचं काय?” तुम्ही काय पण द्या

काटक्याकुटक्यानी बांधलंय खरं
पण पानांच्या आडोशाला लपलंय बरं

कालच की हो चिमणा एक गेला बघून
“चिमणीला दाखवतो” एवढंच म्हणून

तुमचाच जोडिदार होता का तो?

व्वा ! मग प्रश्नच काय उरतो ?

आजच करुन घ्या घरभरणी

बंटीबाबा देतील दाणापाणी







# ३९. बंटीबाबा आणि इडली

एकदा एक इडली सांबाऱ्यात बुडली
चटणीनं बघितलं नि चिड चिड चिडली

चटणी म्हटली इडलीला, "मैत्री का ग तोडली?"
इडली म्हटली, "सांबाऱ्याची संगत आवडली"

तशी चटणी झाली चुप्प, इडली फुगली हुप्प
बंटीबाबानी मग खाल्ली इडली गुप्पागुप





# ४०. उठा उठा बंटीबाबा

कोंबड्यानं दिली कुकुच्कू बांग
उंदरानं टाकली सायकलवर टांग

बाजारात गेला आणायला खाऊ
आडवी आली पोलीस माऊ

पोलिसमाऊनं वाजवली शिटी
भूभू लागला माऊच्याच पाठी

माऊची उडली तारांबळ
उंदराला चढलं हत्तीचं बळ

उंदीरमामाला मिळालि सूट
स्वतासाठी घेतले बाटाचे बूट

मामीसाठी पुरण पोळ्या
पिलांसाठी चॉकलेट, गोळ्या

वजनदार वस्तूनी भरलं दप्तर
सायकलचं चाक मग झालं पंक्चर

उठा उठा बंटिबाबा जागे व्हा
कुर्रकुर्र दात घासुन तोंड धुवा

जाऊ द्या तो उंदीर जाऊ द्या ती माऊ
आपण आपले तोंड धुवुन ब्रेकफास्ट खाऊ







**'मायबोली' मधील काही निवडक प्रतिसाद**

भाऊ नमसकर | - हलकेच छोट्यांच्या निरागस, मिश्कील जगात नेण्याची असाधारण ताकद आहे या ओळींत !

HH | - मस्त जमतेय हो कर्णिक बनुताई सिरीज. गम्मत वाटते वाचायला.

उमेश कोठीकर | - मस्तच आहे मुकुंदजी. आता अल्बम करा लवकर बनुताईंचा. मला खरंच तुमच्या या मानसकन्येला बनूताईला एकदा भेटायचे आहे. तिच्यासाठी खुप साऱ्या गिफ्ट्स आणायच्या आहेत. फारच निरागस आणि सुंदर कविता.

दक्षिणा | - घ्या, मस्त मस्त कविता लिहिताय तुम्ही...आता बनुताईंचा अल्बम निघालाच पाहिजे.

नितिन देशमुख | - लहान मुल होउनच त्यांच्यासारख्या कविता सुचू शकता... तुमच्यातल्या लहान मुलाला प्रणाम. बनू ताइच्या सर्वच कविता इतक्या छान आहेत की त्यांचा पुरेसा संग्रह झाल्यावर कोणत्याही प्रकाशकाकडे नेल्यास आम्हाला त्या पुस्तक स्वरुपात वाचायला नक्कि मिळू शकतील..

वत्सला | - फारच छान आहे बुवा तुमची ही बनुताईची सिरीज! माझ्या ४ वर्ष वयाच्या मुलीला पण या सर्व कविता खुप आवडतात.

वैशू | - खरंच खूप छान! एकामागोमाग एक उलगडत जाणारी मिष्ठास कवितांची मालिका! थोड्या वेळासाठी का होईना मोठठ्यांचं खोट्ं जग विसरायला होतं. आता हा गोड गोड आनंदमेवा अधिकाधिक चाखायला मिळणार म्हणून धन्यवाद!

स्मितागद्रे | - कसली गोड कविता !!!! कर्णिक काका एक संग्रह काढाच आता बनुताईंचा

वत्सला | - वा! किती छान!!! बंटीबाबा आणि बनुताई ही जोडगोळी आता काय काय धमाल करते याकडे लक्ष लागले आहे!

साधना | - ग्रेट.. बनुताईंचा बंटी पण अगदी ताईच्या पावलावर पाउल ठेऊन चालायला लागला.... अजुन दोन दिवस झाले नाही बाप्पाकडुन येऊन तर लग्गेच सुरू....

बासुरी | - वा बनुताई बरोबर आता हा गोडुला बंटी बाबा.. दोघ ही धमाल आणतील आता..आम्ही अजुन उत्सुक झालोय





मधुकर | - कर्णिक काका, अशा गोड गोड कवित वाचुन बनुताई व बंटीचा लळा लागला हो.

रैना | - वाट पहाते आहे माझी लेक या कविता समजण्याएवढी मोठी कधी होईल आणि मी कधी तिला या बनुताई वाचून दाखवेन.

Sanika11 | - बनुताईवर एक छानसे पुस्तक प्रकाशित करा.

कविता नवरे | - छान आहे मुकुंद तुम्ही ह्या कवितांची साखळीच लिहा आणि तुमच्या बनुताईंना ह्या कवितांच एक पुस्तक (प्रिंट करुन सुबक चित्र काढुन, बाईंड करुन) भेट द्या वाढदिवसाची

स्मितागद्रे | - मुकुंद दादा मस्तच !! कवी ला अनुमोदन अगदी मनातल, मस्त चित्रा सकट पुस्तक, मस्त भेट होईल.

# ई साहित्य प्रतिष्ठान

आता मराठी ई पुस्तकं तुम्ही www. esahity. com वरून डाऊनलोड करा.

किंवाesahity@gmail. com ला कळवून मेलने मिळवा. किंवा7710980841हा नंबर सेव्ह करून या नंबरला तुमचे नांव व गांवWhatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा.

किंवा ई साहित्यचे app. https://play. google. com/store/apps/details?id=com. esahity. www. esahitybooks या लिंकवर उपलब्ध आहे.

तेdownload करा.

हे सर्व मोफ़त आहे.





आता ठरवलंय. मराठी पुस्तकांनी अवघं विश्व व्यापून टाकू. प्रत्येक मराठी सुशिक्षिताच्या मोबाईल मध्ये किमान पन्नास मराठी पुस्तकं असलीच पाहिजेत. प्रत्येक मराठी माणसाच्या!

तुमची साथ असेल तर सहज शक्य आहे हे… कृपया जास्तीत जास्त लोकांना यात सामिल करून घ्या.

आपले नम्र

टीम ई साहित्य